# प्रसिद्धिपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

जा.क्र./पोउआ/वाह/ ६२८६ /२०२४ पुणे दिनांक १८ /०६/२०२४

पुणे शहरातील डेक्कन वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, डेक्कन वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापर्वी काही पार्किंग संदर्भातीस आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

## डेक्कन वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

१. प्रभातरोड गल्ली नं.१ मध्ये दक्षिणेस प्रथमेश सोसा. व उत्तरेस पश्चिमेस अमित बोसम सोसायटी पर्यंत पी-१,पी-२ फक्त दुचाकी करीता पार्कीग करण्यात येत आहे.

२. दक्षिणेस असलेल्या लक्ष्मी निवास ते उत्तरेस असलेले अभिनंदन बंगला यांचे दरम्यान फक्त चारचाकी करीता पी-१,पी-२ **पार्कींग** करण्यात येत आहे.

३. दक्षिणेस असलेल्या लक्ष्मी निवास ते ग्रीनपार्क यातील सोसा.चे गेट सोडून फक्त चारचाकी करीता पी-१,पी-२ **पार्कींग** करण्यात येत आहे.

४. उत्तरेस असलेले अभिनंदन बंगला ते निसर्ग सोसा. सदर ठिकाणी सोसा.चे गेट सोडून फक्त चारचाकी करीता पी-१,पी-२ **पार्कींग** करण्यात येत आहे.

५. उत्तरेस असलेले निसर्ग सोसायटीचे बाहेरील बाजूस असलेले ॲड.अभ्यंकर चौक या ठिकाणी १५ फुट अंतरावर चारचाकी वाहने चारचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – १८ / ६ /२०२४ ते दिनांक – ३ /०७/२०२४ पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(रोहिदास पवार)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – २,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४) प्रभारी अधिकारी** (डेक्कन) वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.